# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२–२३/३३२

क्र.२/२०२२–२३ गोपनीय
व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२–२३ मधील**
**<u>८ मार्च, २०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त</u>**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची पंधरावी सभा गुरूवार, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी सायंकाळी ७.३० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, मुंबई – ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | प्रा. दिगंबर शिर्के ( प्रभारी कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. अजय भामरे (प्रभारी प्र–कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३. | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४. | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५. | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६. | प्रा. शिवराम एस. गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७. | डॉ. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १०. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११. | प्रा. सुनिल भिरूड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य | उपस्थित |
| १२. | प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १३. | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व मु मं) | निमंत्रित | उपस्थित |

SKO

➢ श्रध्दांजली

## देवीसिंह शेखावत

भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे पती देवीसिंह शेखावत यांचे २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. १९७२ मध्ये मुंबई विद्यापीठातून पीएचडी केली. मृत्यूसमयी ते ८९ वर्षाचे होते.

## अजित वर्टी

माजी अतिरिक्त मुख सचिव, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाचे माजी आयुक्त आणि राज्य लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष अजित वर्टी यांचे दिनांक ४ मार्च, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ८० वर्षाचे होते.

## विष्णू विश्वनाथ करमरकर

चिकित्सक पत्रकरिता व विश्लेषणात्मक लेखनशैलीचा आयाम मराठी क्रीडा पत्रकारितेमध्ये रूजवणारे आणि मराठी दैनिकांमध्ये क्रीडा पान ही संकल्पना प्रथम राबवणारे ज्येष्ठ क्रीडा पत्रकार, संपादक, समीक्षक आणि लोकप्रिय समालोचक विष्णू विश्वनाथ तथा वि.वि. करमकर यांचे दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी जे ८५ वर्षाचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | मुंबई विद्यापीठाचे सन २०२२-२०२३ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज व २०२३-२०२४ चा अर्थसंकल्पीय अंदाजाचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाचे २०२२-२०२३ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज व २०२३-२०२४ चे अर्थसंकल्पिय अंदाजाच्या मसुदयास मान्यता देण्यात आली.<br>वित्त व लेखा अधिकारी यांनी २०२२-२०२३ चे सुधारीत अर्थसंकल्पिय व २०२३-२०२४ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा सादर केला. त्यांना प्रा. (डॉ.) अजय भामरे यांनी अनुमोदन दिले. सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दि. ८ मार्च, २०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बाब क्र. १ | |

5105

| | | |
|---|---|---|
| | अन्वये सुधारणेसह सुचविलेल्या शिफारशीनुसार मुंबई विद्यापीठाचे २०२२-२०२३ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज व २०२३-२०२४ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा मान्य करण्यात आला. सदर अर्थसंकल्पीय अंदाज महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९ (छ) प्रमाणे अधिसभेच्या मान्यतेकरिता सादर करावा, अशी शिफारस करण्यात आली. तसेच डॉ. सी.ए. प्रदीप कामथेकर, वित्त व लेखा अधिकारी यांना २०२२-२०२३ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसूदा व सन २०२३-२०२४ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा अधिसभेमध्ये सादर करण्यासाठी नामनिर्देशित करण्यात आले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

उपकुलसचिव (प्रभारी)

कुलसचिव (प्रभारी)

प्र- कुलगुरू (प्रभारी)

इतिवृत्त मंजुर

मा. कुलगुरू (प्रभारी)